पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४७५ दिनांक - ३०/०६/२०२३**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**"घरफोडया चोरी करणा-या परराज्यातील टोळीचा पर्दाफाश"**

कोंढवा पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडी गुन्हयातील आरोपी यांचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),संजय मोगले, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),संदिप भोसले यांनी सुचना दिल्या होत्या.

सदर सुचनाप्रमाणे तपास पथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,अनिल सुरवसे, पोलीस अंमलदार, अमोल हिरवे, गणेश चिंचकर, अभिजीत रत्नपारखी, सुहास मोरे, राहुल थोरात, विकास मरगळे, राहुल रासगे, राहुल वजारी असे गुप्त बातमीदाराचे मार्फतीने तसेच कोंढवा पोलीस ठाणेच्या लगत पुणे ग्रामीण हद्दीतुन येणारी वाहने रात्रगस्ती दरम्यान चेक करुन शोध घेत दि.२१.०६.२०२३ रोजी खडी मशिन चौक परिसरात आले असताना,पोलीस निरीक्षक,गुन्हे,संदिप भोसले यांना त्याचे गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, परराज्यातुन येवुन पुण्यात घरफोडया चोरी करणारी टोळी ही सासवड भागातील चांभळी गावात राहण्यास आहे.

सदर टोळीचा प्रमुख आरोपी **सुरेंद्र असलारामजी चौधरी,वय २८ वर्षे,रा.मु.पो सौजाद,ता.मारवाडी, जक्शन,जि.झालोर** हा त्याच्या साथीदारासह मध्यरात्रीच्या सुमारास घरफोडी चोरी करण्यासाठी बाहेर पडत असतात. त्यांनी कोंढवा भागातही स्विप्ट कार चोरी करुन घरफोडी चोरी केलेली असुन,तो सांयकाळी कान्हा हॉटेल चौकात गाडीवरुन कोणाला तरी भेटण्यासाठी येणार आहे. त्याने पांढरा शर्ट व काळी पॅन्ट परिधान केलेले आहे.

सदर प्राप्त माहितीच्या अनुषंगाने वरिल स्टाफच्या मदतीने कान्हा हॉटेल चौकात सापळा रचुन त्यास ताब्यात घेण्यासाठी जात असताना तो पळुन जाण्याचा प्रयत्न करीत होता. त्यास स्टाफचे मदतीने पकडुन मिळालेल्या बातमीप्रमाणे तपास करता त्याने दाखल गुन्हयातील घटनास्थळ १)अजमेरा पार्क लेननंबरनम्रा मस्जिद शेजारी,कोंढवा येथुन घरफोडी चोरी केल्याचे २)प्रथम प्रेस्टिज कॉम्प्लेक्स शॉप नं.०६ उंड्री पुणे, येथील नवहिंद ड्रायक्लिनर्स लॉड्री दुकाना समोरिल मोकळया जागेमधुन ग्रे रंगाची इको कार क्रं.एम.एच.१२ एन.यु.३३७, ३)भोसरी भागातील मोशी चौकाच्या अलीकडे असणा-या पाटसकर हॉस्पीटल बिल्डींग समोर पार्क केलेली बोलेरो पिकअप क्रं.एम.एच.१२/के.पी.४५४४ ४)मंचर याठिकाणी चांडोली खुाा गावातील नाथ ट्रेडर्स नावाचे किराणा दुकान ५)लोणीकंद भागातील तुळापुर रोडचे गुरुकृपा ट्रेडर्स नावाचे किराणा दुकान ६) लोणीकंद भागातील ए.पी.विठाई पेट्रोल पंपाचे शेजारील मारुती ट्रेडर्स नावाचे किराणा दुकान ७)यवत भागातील सहजपुर फाटया जवळील पुण्याकडील येणा-या रोडवर असणा-या मारुती सुझुकी शो-रुम मधील स्विप्ट कार क्रं.एमएच/१२/केइ/४५५५ अशा प्रकारच्या चो-या साथीदार नेमाराम उर्फ डौलाराम चौधरी, भुंडाराम उर्फ राजु चौधरी यांच्यासह केल्याचे सांगितले. त्यांच्याकडुन रोख रक्कम, ३,००,०००/- रुपये, पिकअप गाडी, १,००,०००/- रु किंमती, मारुती कंपनीची इको कार, ४,००,०००/- रु किंमती, मारुती सुझुकी शो-रुम मधील स्विप्ट कार असा एकुण ८ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल व घरफोडी चोरी करण्यासाठी वापरलेले मोठया लोखंडी कटावणी, स्क्रु ड्रायव्हर, पकड, लहान मोठे स्पॅनर, हॅसा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपी व त्याचे साथीदार नेमाराम उर्फ डौलाराम चौधरी, भुंडाराम उर्फ राजु चौधरी यांच्याविरुध्द यापुर्वी २१ घरफोडीचे व इतर गुन्हे दाखल असुन त्याच्या विरुध्द एपीएमसी पोलीस नवी मुंबई गुरन.२१२/२०१९ प्रमाणे दाखल असणाऱ्या गुन्हयात मोक्याची कारवाई करण्यात आली होती. सदर आरोपी हे जामीनावर बाहेर आले असताना त्यांनी पुन्हा गुन्हे केले आहेत. आरोपी यांच्याकडे तपास केला असता त्याने त्याचे साथीदार नेमाराम उर्फ डौलाराम चौधरी,भुंडाराम उर्फ राजु चौधरी यांच्यासह खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे उघड झालेले आहेत.

१)कोंढवा पो ठाणे गुरन.१७२/२०२३, भा.दं.वि.कलम.४५४,३८०,५०६

२)कोंढवा पोलीस ठाणे कडील गुरन.५८०/२०२३, भा.दं.वि.कलम.३७९.

३) मंचर पोलीस ठाणे गुरन.२११/२०२३ भादवि कलम.४६१,३४.

४) लोणीकंद पोलीस ठाणे गुरन.४८५/२०२३ भादवि कलम.४५७,३८०.

५) लोणीकंद पोलीस ठाणे गुरन.४८५/२०२३ भादवि कलम.४५७,३८०.

६) भोसरी पोलीस ठाणे गुरन.५१८/२०२३ भादवि कलम.३७९.

७) यवत पोलीस ठाणे गुरन.६३१/२०२३, भादवि कलम.४६१,३८०.

वरिलप्रमाणे चोरी केलेल्या ठिकाणावरुन आरोपी याने एकुण १० लाख रुपये किमतीचा किराणा माल चोरी केलेला आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्वे प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजन शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परि.५,श्री.विक्रम देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे,श्री.शाहुराव साळवे यांचे मागदर्शनाखाली करण्यात आली आहे.

